# नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका, नांदेड.

## सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

**श्री अशोक सुर्यवंशी**
प्रकल्प संचालक
नां.वा.श.म.न.पा.नांदेड

**श्री जगदिश कुलकर्णी**
सहाय्यक आयुक्त तथा स.प्रकल्प अधिकारी
नां.वा.श.म.न.पा.नांदेड

# सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना
## प्रस्तावना

- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची सुरुवात दि. 1 डिसेंबर 1997 पासून झाली.
- नेहरु रोजगार योजना (NRY)
- शहरी गरीबांसाठी मुलतः आवश्यक सेवा (UBSP)
- पंतप्रधान एकात्मिक शहरी दारिद्रय निर्मूलन योजना (PMIUPEP)

या सर्व योजनांचा एकत्रित अभ्यास करून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना (SJSRY) तयार केली गेली आहे.

# योजनेसाठी पात्रता निकषः-

नागरी भागातील दारिद्रय रेषेखालील जनतेच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी. त्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाने डिसेंबर 1997 पासून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सुरु केली. कुटूंबांचे दरमहा दरडोई उत्पन्न रु. 419.98 अशी उत्पन्न मर्यादा शासनाने निर्धारीत केली होती. सन 1999-2000 पासून योजना नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका कार्यक्षेत्रात सुरु झाली. त्याकाळात 6984 कुटूंबे दारिद्रय रेषेखालील होती. महाराष्ट्रातील सर्व महानगर पालिका/नगर परिषदा/नगर पंचायतीमध्ये ही योजना राबविण्यात येते.


- सन 2005-2006 मध्ये योजनेचे पुर्नसर्व्हेक्षण करण्यात आले व ज्या कुटूंबांचे दरमहा दरडोई उत्पन्न रु 591.75 पैसे आहे. त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. यासाठी त्यांचे नाव दारिद्रय रेषेखालील लाभार्थी म्हणून नोंदलेले हवे.
- सन 2005-2006 च्या सर्व्हेक्षणानुसार 21584 कुटूंबे दारिद्रय रेषेखालील आली. या योजनेमध्ये किमान 30 टक्के लाभार्थी महिला आणि 3 टक्के लाभार्थी अपंग असतील. जाती / अनुसूचित जमातीचे लोकसंख्येच्या प्रमाणात लाभार्थी असतील.

# सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची सुधारित उदिष्टे


- शहरातील गरिबी दुर करण्यासाठी बचतीची सवय लावणे. सावकारी पाशातून मुक्त होणेसाठी बचतगट स्थापने आर्थिक स्वावलंबनाकडे बेरोजगारांना रोजगार / स्वयंरोजगार करण्यासाठी वैयक्तिक आणि गटाने उद्योग सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्यासाठी लाभार्थीना कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे.
- समाज सक्षम होण्यासाठी लाभार्थींना दारिद्रय रेषेखालील लोकांना शेजार समुहगट (NHG) शेजार समुह संस्था (NHC) आणि समाज विकास संस्था (CDS) संस्था स्थापन करणे.
- **विस्तार / व्याप्ती ः-**
- नियोजन मंडळाने वेळोवेळी बदल केल्याप्रमाणे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत शहरात राहणारे दारिद्रय रेषेखालील असलेल्या लाभार्थ्यांना लाभ घेता येईल.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना


# योजने अंतर्गत वस्तीमधील कार्यकारी रचना



SJSRY अंतर्गत छोट्याशा वस्तीपातळीवर शेजारसमूह तयार केला पाहिजे.
शेजारसमूहात १० ते ४० घरांचा समावेश असला पाहिजे. (NHC)



प्रत्येक शेजारसमूहाने एक वस्तीस्वयंसेवक निवडला पाहिजे.
वस्तीस्वयंसेवक (RCV) प्रामुख्याने स्त्री असावी.



दहा वस्तीस्वयंसेवक मिळून एक शेजारसमिती (NHC) तयार केली पाहिजे.



२००० घरे, कुटुंब मिळून एक वस्तीसुधार सोसायटी निर्माण करण्यात यावी. (CDS)

# शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम (USEP)

- या अर्थशिर्षकाखाली दोन प्रकारांनी मदत देता येईल.
  - वैयक्तिक लाभार्थ्यांना स्वयं रोजगारासाठी अनुदान व कर्ज देणे.
  - लाभार्थ्यांना तंत्रज्ञान / विपणन/पायाभूत सुविधा आणि इतर आवश्यक मदत देणे.
- 
- लक्ष्य **(TARGET GROUP):-**
  - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेखाली महिला लाभार्थींचे प्रमाण 30 टक्के असावे.
  - एस.सी.आणि एस.टी.साठी एकूण शहरातील बीपीएल संख्येच्या प्रमाणात लाभ घ्यावा.
  - विविध प्रकारच्या अपंगाचे 3 टक्के प्रमाण असावे.

# लाभार्थी निवड

- झोपडपट्टीतील प्रत्येक बीपीएल घरांची पाहणी करावी.
- महिला लाभार्थीसाठी – महिला कुटूंब प्रमुख असलेल्या कुटूंबांना प्राधान्य द्‍यावे.
- **समुह दृष्टिकोन ः-(CLUSTER APPROACH)**
  - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये अनेक उदयोगाचा समावेश करुन त्यांना कौशल्य वृध्दी,स्वयंरोजगार किंवा रोजगार लाभ दयावा.
  - यामध्ये वैयक्तिक स्वयंरोजगार योजना निर्मिती, सेवा किंवा इतर उदयोग सुरु करणे.
  - लाभार्थ्यांने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना यासारख्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. हे त्याने जाहिर करावे.
- उदा. **PMEGP**

# स्वयंरोजगांसाठी तीन प्रकारच्या उद्योगांवर भर आहे. निर्मिती,सेवा आणि व्यापार

- **1.निर्मिती** - निर्मिती उदयोगाची समुहाने सुरु उदयोग करण्यास प्रोत्साहन दयावे.
- **2.सेवा** - सेवा उदयोगांसाठी दर 50,000 लोकसंख्येकरीता सेवा/सुविधा केंद्र स्थानिक स्वराज्य संस्थाकडून उभारावीत.
- **3. व्यापार** - व्यापाराकरीता स्थानिक स्वराज्य संस्थेने फिरते केंद्र किंवा शक्य असेल तिथे त्यांना स्वतंत्र जागा किंवा गाळे दयावे.
- **आर्थिक स्त्रोतः-**
- **वैयक्तिक प्रकल्प** - वैयक्तिक प्रकल्पासाठी अधिकतम प्रकल्प किंमत रु. 2,00,000/- आहे.
- **अधिकतम अनुदानः-** अधिकतम अनुदानासाठी प्रकल्प किंमतीच्या 25% अथवा रु. 50,000/- पर्यंत आहे.
- **लाभार्थी सहभाग -** लाभार्थ्यांचा सहभाग प्रकल्प किंमतीच्या 5 टक्के असतो.

## Urban Women Self Help Programme (UWSP)
## शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रमाचे दोन प्रकार आहेत .

- गटाने व्यवसाय करणा-या महिलांना कर्ज आणि अनुदान.
- **<u>फिरता निधी -</u>** गटासाठी /बचत आणि पत संस्थासाठी शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम (कर्ज आणि अनुदान) ः- ज्या महिलांना गटाने व्यवसाय करावयाचा आहे. त्यांनी बाजारपेठ आणि त्यांच्या कौशल्याशी सुसंगत असा व्यवसाय निवडावा.
- **<u>गटाने व्यवसाय सुरु करण्यासाठी खालील बाबी ः-</u>**
- 1.दारिद्रय रेषेखालील किमान 5 महिला असाव्यात.
- 2. हया महिलांचे एकमेकिशी चांगले संपर्क/समजूतदार पणा असावा.
- 3.गटाने स्वतः उदयोग निवडावा.
- 4.विशेषतः महिला बचतगट किंवा बचत/पत संस्थेत सहभागी असाव्यात.

- महिला गटाला व्यवसाय सुरु करण्यासाठी रु. 3,00,000/- किंवा प्रकल्प किंमतीच्या 35 टक्के अनुदान असेल किंवा रु. 60,000/- प्रति सभासद, अनुदान (जी कोणती रक्कम कमी असेल त्याप्रमाणे) कर्ज मर्यादा 9,00,000/-
- या व्यतिरिक्त राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज 60%
- गटाचा स्वतःचा सहभाग 5 %
- **3. शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम (फिरता निधी )**
- 1. किमान 5 बीपीएल महिलांचा एक गट तयार करावा .
- 2. या कार्यक्रमांतर्गत बचतगट/बचत आणि पत संस्थेस रु. 25,000/- पर्यंत फिरता निधी देता येईल किंवा प्रती सभासद रु . 2,000/ फिरत्या निधीचा उपयोग पुढील प्रमाणे करावा.

- अ. कच्या मालाच्या खरेदीसाठी किंवा मार्केटिंगसाठी
- ब. गटाच्या व्यवसायाच्या पायाभूत सुविधेसाठी
- क. बालकांच्या जोपासनेसाठी फक्त एक वेळच्या खर्चासाठी
- ड. गटाला बँकेच्या भेटीसाठी रु. 500/ आत.
- इ. ज्या सभासदाने गटाकडे किंवा बचत आणि पतसंस्थेकडे रु. 500/- बारा महिन्यात बचत
- केली आहे. अशा सभासदांचे रु. 30/- आरोग्य/जीवन/अपघात/इतर विमा योजनेत खर्च करण्यास मुभा आहे. जिथे एखाद्या सभासदाने रु. 750/- बारा महिन्यात बचत जमा केली असेल तर त्यांना रु.60/ आरोग्य/जीवन/अपघात/इतर विमा योजनेत रु. 30/- सभासदास व रु. 30/- सभासदाचा पती किंवा तिच्या अल्पवयीन मुलींसाठी आरोग्य आणि अपघात विम्यासाठी गुंतवता येतील.

- **Skill Training for Employment promotion Amongst Urban Poor (Step-up):-**
- **सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे ध्येय कौशल्य मिळविणे आणि कौशल्य वृध्दींगत करणे.**
  - Step-up मध्येही 30 टक्के महिलांना, 3 टक्के विविध अपंगांसाठी, मागासवर्गीय जाती आणि जमातींच्या एकूण संख्येच्या शहराच्या बीपीएल लोकसंख्येच्या प्रमाणात संधी देता येईल.
  - प्रशिक्षण सेवा,व्यापार आणि निर्मिती उद्योगासाठी स्थानिक बाजारपेठेशी सुसंगत व्यवसायाचे किंवा कलेचे प्रशिक्षण देता येईल.

- **कौशल्य प्रशिक्षणासाठी खालील संस्थांची निवड करावी.ज्यामध्ये**
- **Public private partnership (P-P-P)** व प्रथितयश संस्था असाव्यात.
  - 1. **ITI / Polytechnics**/टेक्नीकल हायस्कूल
  - 2. औदयोगिक संस्था
  - 3. अभियांत्रिकी विद्यालय
  - कौशल्य प्रशिक्षणासाठी प्रति लाभार्थी रु. 10,000/- फक्त खर्च देय असेल,या खर्चामध्ये कच्चामाल, लाभार्थीसाठी टुल किट व इतर खर्चाचाही समावेश असेल.

# समाज विकास संस्था (सी.डी.एस)

- शहर पातळीवर सगळया शेजार समुह गटांची औपचारीक संस्था म्हणून समाज विकास संस्थांची स्थापना करावी.
- समाज विकास संस्थेत निवड केलेले/नेमणूक केलेले सभासद असावेत.
- समाज विकास संस्थेची सोसायटी नोंदणी कायदयांतर्गत नोंदणी करावी.
- **समाज विकास संस्थेच्या जबाबदा-या**
  - शहरातील सर्व वस्त्यांच्या मुख्यत्वे महिला आणि बालकांच्या आवश्यकता/गरजा सर्व स्तरावर मांडणे.
  - वरील गरजा पुर्ण होण्यासाठी वेगवेगळया विभागाशी पाठपुरावा करणे.
  - समाज विकास संस्थेच्या प्रतिनिधींची क्षमता वाढवण्यासाठी इरत आवश्यक बाबींवर प्रशिक्षण देणे.
  - स्वयंरोजगार करण्यासाठी वस्त्यांमध्ये पाहणी करुन लाभार्थी निवड करणे
  - वस्त्यांच्या विकासासाठी आराखडा आणि प्रस्ताव तयार करुन विविध विभागांशी संपर्क साधून तो प्रस्ताव पुर्णत्वास नेणे.
  - बॅंकांशी समन्वय व बॅंकांमार्फत परतफेडीसाठी मदत.
  - दारिद्रय निर्मूलन कक्ष आणि स्वायत्त संस्थांच्या प्रयत्नातून कमी उत्पन्न गटांच्या वस्त्यांमध्ये संपत्ती निर्माण करणे.

## सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने संदर्भात वस्तीशी जवळीक साधण्यासाठी वस्तीत करण्याजोगे कार्यक्रम

- मोर्चा किंवा प्रभात फेरी काढणे.
- फिरते प्रदर्शन भरविणे.
- पथनाटय सादर करणे.
- एकपात्री नाटक सादर करणे.
- वस्तीचे उत्सव/सण साजरे करण्यात सर्वांचा सहभाग घेणे. सर्व कार्यक्रमाच्या नोंदी ठेवणे आणि वस्ती पातळीवर कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी ही नोंद महत्वाची आहे का ? याचे विश्लेषण करणे.

# विविध पातळीवर कार्यक्रमाची अंमलबजावणी

- वयोगटाप्रमाणे
- शालेय पातळीवर
- स्वास्थ्य केंद्रात किंवा शाळेत
- वस्तीपातळीवर

# वयोगटाप्रमाणे किंवा शालेय पातळीवर

- वयोगटाप्रमाणे मुलांची तपासणी करणे.
- आरोग्यविषयक वैदयकिय तपासणी करणे.
- तपासलेल्या मुलांची वर्गवार माहिती भरणे.
- रोगनिवारक उपचार करणे.
- रोगप्रतिबंधासाठी स्वास्थ्य प्रशिक्षण देणे.

- **<u>वस्तींमध्ये वस्तीशी जवळीक</u>**
- स्थानिक वस्तींच्या पुंढा-यांची सभा घेणे.
- स्थानिक समाजकार्यकर्त्यांच्या सभा घेणे
- शासकीय व सामाजिक संस्थांच्या सभा घेणे.
- **<u>वस्तींचा सहभाग</u>**
- अंध विश्वास दुर करुन वस्तीला चुकीच्या समजुती पासून वंचित करणे. आरोग्य विषयक शिबीर भरवून स्वतःच्या व वस्तीच्या आरोग्यासंबंधी जागृती करणे आणि त्यातून होणा-या फायदयाची जाणीव करुन देणे.
- कुटुंबाशी जवळीक
- कुटूंब विषयक मुलाखती घेणे.
- कुटूंबातील व्यक्तिंची आरोग्यविषयक तपासणी करणे.
- पालकांच्या सभेसाठी कुटूंबातील व्यक्तिंना आमंत्रित करणे.

# गटाची वैशिष्टये

- गटांतील सभासदांनी सतत संपर्क व समन्वय ठेवणे.
- गटाचे नियम स्वतःच ठरविणे.
- सभासद किती घ्यावेत हे ठरविणे.
- बचत रक्कम ठरवावी.
- बँकेकडून कर्ज किती घ्यावे ठरविणे.
- सभासदांना कर्ज देणे.
- सर्व कामांची तपशीलवार नोंद ठेवणे.
- गट चालविण्यासाठी सदस्यांना प्रशिक्षण देणे.
- अनुभवांची देवाण-घेवाण.

# बचतगटाचे फायदे

- सावकारापासून मुक्तता
- स्वावलंबन, बचतीवर कर्ज मिळते.
- बचतीची सवय लागते.आत्मविश्वास वाढतो.
- विविध अडचणी सोडविण्यासाठी व्यक्तिगत व सामुहिक ताकद वाढते.
- संघटक,नेतृत्व गुण,वाढीस लागून समाजात महिलांचे स्थान निर्माण होते.
- आर्थिक विकासाचे पर्याय खुले होतात.

# सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना लाभार्थी संख्या

## सन 1999-2000 ते सन 2011-2012

| अ.क्र. ध | घटकाचे नाव | लाभार्थी संख्या | अनुदान रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | शहरी स्वयंरोजगार कार्यक्रम | 1354 | 1,39,60,000/- |
| 2 | कौशल्य प्रशिक्षण | 3032 | 88088000/- |
| 3 | शहरी महिला स्वयंसहाय्यता कार्यक्रम | 166 | 2,21,48,000/- |
| 4 | बचत व पतसंस्था | 597 | 77,41,398/- |
| 5 | मुलभूतसोयी-सुविधा | 10 गाळे 2 सुविधा केंद्र | 30,44,801/- |
| 6 | शहरी समाज विकास नेटवर्क (सामाजिक संस्था सीडीएस एकूण 03) | एकूण सभासद 21584 | 5,23,250/- |
| 7 | शहरी मजुरी रोजगार कार्यक्रम | 127 दगडी नाली व रस्ते | 1,28,66,000/- |

# स्वयंरोजगार घटकाअंतर्गत विविध व्यवसायांसाठी कर्ज व अनुदान









# स्वयंरोजगार घटकाअंतर्गत विविध व्यवसायांसाठी कर्ज व अनुदान






# कौशल्य प्रशिक्षण घटकाअंतर्गत BPL लाभार्थ्यांना प्रशिक्षण



* महिला व बालके यांचा विकास या घटका अंतर्गत 16 महिलाबचत गटांचे *सुपर मार्केट*

* महिला व बालके यांचा विकास या घटका अंतर्गत बचत गटास टाटा सूमो वितरीत






# महिला व बालके यांचा विकास या घटका अंतर्गत विविध व्यवसायाकरीता कर्ज व अनुदान



# महिला व बालके यांचा विकास या घटका अंतर्गत विविध व्यवसायाकरीता कर्ज व अनुदान





# महिला बचत गटांच्या मेळाव्यात व्यवसायिक मार्गदर्शन करतांना



# बचत व  पतसंस्था या घटकाअंतर्गत फिरता निधी वाटप



# महिला बचत गटाची मासिक बैठक



# योजनेशी संबंधीत वर्तमान पत्रातील बातमी

प्रजावाणी

शनिवार, दि. २ एप्रिल २०११

Postal Regd. Licence No. G-2/RNP/NND-50/2009-11

## बचतगटाच्या माध्यमातून महिलांनी सर्वांगिण विकास साधावा - सूर्यवंशी

नांदेड, दि. १ : बचतगटाच्या माध्यमातून महिलांनी सर्वांगिण विकासा साधावा असे प्रतिपादन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे प्रकल्पसंचालक ए. एम. सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

जनजागृती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नांदेड यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त बोरबन फॅक्ट्री गोवर्धनघाट येथे महिला बचतगट मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यावेळी सूर्यवंशी हे बोलत होते. हे पुढे म्हणाले बचतगट ही एक शक्ती असून महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून सर्वांगिण विकास साधावा असे सांगून त्यांनी उपस्थितांना बचतगटाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक तुलजेस यादव हे होते. यावेळी महिलांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीबाई वाघमारे, राजु वाघमारे, गणेश सरोदे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अंकुश वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन पालखे यांनी घेतला.



# धन्यवाद